# प्रेसनोट

नाशिक,
दि. २५/०१/२०२३

**आलोसे क्र.१) महेशकुमार महादेव शिंदे, जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, अतिरिक्त कार्यभार उपसंचालक भूमि अभिलेख नाशिक , जि.नाशिक, २) अमोल भीमराव महाजन, कनिष्ठ लिपिक, जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय नाशिक यांनी ५०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | सरकारवाडा पोलीस ठाणे, नाशिक शहर गुरनं. १७/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ , १२ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लक्ष्मण फकीरा वैराळ, कोतवाल, सजा - भरवस, ता.निफाड,जि.नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,८०,०००/- रुपये ( तडजोडी अंती १,००,०००/- रुपये ) |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | **५०,०००/- रूपये** ( तडजोडी अंती १,००,०००/- रुपये पैकी) |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांच्या वडिलांचे नांवे असलेल्या शेत जमिनीचा भूमि अभिलेख कार्यालयाने तयार केलेला हिसा नमुना १२ मध्ये लिखाण प्रमादची चूक झालेली असून सदरची चूक दुरुस्तीचे आदेश देण्यासाठी **आलोसे क्र.१)** महेशकुमार महादेव शिंदे, जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, अतिरिक्त कार्यभार उपसंचालक भूमि अभिलेख नाशिक, जि. नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे १,८०,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान **आलोसे क्र.१)** महेशकुमार महादेव शिंदे, जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, अतिरिक्त कार्यभार उपसंचालक भूमि अभिलेख नाशिक, जि. नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडी अंती १,००,०००/- रुपये लाचेची मागणी केली व **आलोसे क्र.२)** अमोल भीमराव महाजन, कनिष्ठ लिपिक, जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय नाशिक यांनी तक्रारदार यांना सदर लाचेची रककम देण्यास प्रोत्साहित केले. तसेच मागणी केलेल्या १,००,०००/- रुपये लाचेच्या रक्कमेपैकी ५०,०००/- रुपये लाचेची रक्कम **आलोसे क्र.१)** महेशकुमार महादेव शिंदे यांनी तक्रारदार यांचेकडून दि. ३१. १.२०२३ रोजी जिल्हा अधिक्षक, उप अधिक्षक, भूमि अभिलेख, नाशिक यांचे कार्यालयीन दालनात स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आल्याने दोघांविरुध्द सरकारवाडा पोलीस ठाणे, नाशिक शहर गुरनं. १७/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १२ प्रमाणे दि.०१/०२/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक्र :- ९९३०९९७७००

**( नरेंद्र भा.पवार )**
पोलीस उपअधीक्षक( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक.